महाराष्ट्र शासन
पोलीस आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर,
मिल कॉर्नर, डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड, छत्रपती संभाजीनगर-431001.
दुरध्वनी क्रमांक 0240-2240591,फॅक्स क्र.0240-2240596
ई मेल :- cp.aurangabad@mahapolice.gov.in

क्र.कक्ष-१०/पो.शि/भरती-प्रेसनोट/२०२४/9953 छत्रपती संभाजीनगर, दिनांक २४.०६.२०२४

# प्रेस नोट

पोलीस आयुक्तालय, छत्रपती संभाजीनगर आस्थापनेवर रिक्त असलेली २१२ पोलीस शिपाई पदा करिता एकुण १६१३३ उमेदवारांनी आवेदन अर्ज सादर केलेले आहे. सदरची भरती प्रक्रियेतील उमेदवारांचे शारीरीक मोजमाप व मैदानी चाचणी दिनांक १९ जुन २०२४ ते २६.६.२०२४ या कालावधीत सकाळी ५.०० वाजले पासुन विभागीय क्रिडा संकुल, सुतगिरणी चौक, गारखेडा परिसर, छत्रपती संभाजीनगर या मैदानावर सुरु आहे.

रात्री लवकर आलेल्या उमेदवारांची गैरसोय होवु नये या करिता त्यांच्या राहण्याची वाणी मंगल कार्यालय येथे सोय केलेली आहे. मैदानी चाचणीमध्ये उमेदवारांना अस्वस्थता वाटल्यास अगर जखमी झाल्यास त्यांना तात्काळ उपचारासाठी डॉक्टरांची टिम उपलब्ध करुन ठेवलेली आहे. तसेच पिण्याचे पाणी अल्पोपहार, ओआरएस युक्त पाण्याची व्यवस्था करण्यात आलेली आहे.

दि.१९.६.२०२४ ते २४.६.२०२४ पावेतो शारिरिक मोजमाप व मैदानी चाचणी करीता बोलाविण्यात आलेल्या उमेदवारांची माहिती खालील प्रमाणे आहे.

| दिनांक | एकुण बोलविलेले उमेदवार | हजर उमेदवार | इतर कारणामुळे शा.मोजमाप व मैदानी चाचणी करण्यास ईच्छुक नसलेले उमेदवार | छाती उंची मध्ये अपात्र उमेदवार | एकुण गैरहजर उमेदवार | मैदानी चाचणी करिता पात्र उमेदवार |
|---|---|---|---|---|---|---|
| १९.६.२०२४ | २१०० | १२८८ | २० | २५५ | ८१२ | १०१३ |
| २०.६.२०२४ | २१०० | १२८२ | १० | २२२ | ८१८ | १०५० |
| २१.६.२०२४ | २१०० | १३५६ | ४ | १५१ | ७४४ | १२०१ |
| २२.६.२०२४ | २१०० | १३४५ | ९ | १४३ | ७५५ | ११९३ |
| २३.६.२०२४ | २४५३ | १३१९ | ६ | १२८ | ११२० | ११९९ |
| २४.६.२०२४ | १८६१+३५+(३३६) | १०१०+३५+(३३६) | ०० | १०८ | ८५० | ९११+३५+(३३६) |
| एकुण | १२७५७ | ७६३५ | ४९ | १००७ | ५०९९ | ६६०२ |

दि. २३.६.२०२४ रोजी दुपारी १३.३० वाजता पाऊस आल्याने उमेदवारांची मैदानी चाचणी न झालेल्या उमेदवारांना आज दि. २४.६.२०२४ रोजी बोलाविण्यात आलेले होते त्यापैकी उपस्थित उमेदवारांची मैदानी चाचणी पुर्ण करुन घेण्यात आली आहे.

मा.संदिप पाटील, भापोसे, पोलीस आयुक्त छत्रपती संभाजीनगर याच्या मार्गदर्शना खाली पोलीस भरतीची प्रक्रिया अतिशय शांततेत पार पडत आहे. मा.पोलीस आयुक्त यांनी उमेदवारांना आवाहन केले आहे की, त्यांनी कोणाच्याही भुलथापांना/अमिषाला/प्रलोभनाला बळी पडु नये कोणी भरती करुन देतो असे आश्वासन देत असल्यास तात्काळ वरिष्ठ पोलीस अधिकारी तसेच नियंत्रण कक्ष पोलीस आयुक्त कार्यालय छत्रपती संभाजीनगर शहर यांचे ०२४०-२२४०५००, २२४०५११ या क्रमांकावर संपर्क करावा. तसेच लाचलुचपत विभाग छत्रपती संभाजीनगर यांचे कार्यालयीन हेल्पलाईन क्र.१०६४ व ०२४०-२३३४०४५ या क्रमांकावर संपर्क साधावा.

( शिलवंत नांदेडकर )
पोलीस उप आयुक्त (मुख्यालय)
पोलीस आयुक्तालय, छत्रपती संभाजीनगर.